महाराष्ट्र शासन
इतर मागासवर्ग व बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
महाज्योती
ज्ञानदीप समतेचा
कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर
पत्ता : डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, ३ रा माळा, दीक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ, नागपूर § ४४० ०२२
दूरध्वनी क्र.०७१२- २९५९३८१ CIN No. U८५३००PN२०१९NPL१८७४०५ ई-मेल: fellowshipmahajyoti@gmail.com

जावक क्र.महाज्योती/PHD/२०२३/२५१० दि.१७.११.२०२३

**महात्मा ज्योतिबा फुले संशोधन अधिछात्रवृत्ती (MJPRF) वर्ष २०२३**
**करिता अर्ज केलेल्या उमेदवारांना त्रुटी पूर्तता करण्याबाबत सूचना.**

- महात्मा ज्योतिबा फुले संशोधन अधिछात्रवृत्ती (MJPRF) वर्ष २०२३ योजनेकरिता महाज्योतीने दि.२४.०६.२०२३ पासून दि.२०.०८.२०२३ पर्यंत महाज्योतीच्या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज मागविलेले होते.
- तसेच ऑनलाईन अर्जाची प्रिंट काढून आवश्यक कागदपत्रांसह हार्ड कॉपी प्रत दि.३०.०८.२०२३ पर्यंत महाज्योती, नागपूर कार्यालयात सादर करण्याकरिता मुदत देण्यात आलेली होती.
- सदर योजनेकरिता दि.२०.०८.२०२३ पर्यंत महाज्योतीच्या संकेतस्थळावर १४५३ परिपूर्ण ऑनलाईन अर्ज प्राप्त झालेले आहेत. तसेच दि.३०.०८.२०२३ पर्यंत महाज्योती, नागपूर कार्यालयात १३५१ इतक्या विद्यार्थ्यांनी अर्जाची हार्ड कॉपी प्रत या कार्यालयात सादर केलेली आहे तर ७० इतक्या विद्यार्थ्यांनी अर्जाची हार्ड कॉपी प्रत या कार्यालयात सादर केलेली नाही.
- प्राप्त झालेल्या अर्ज व आवश्यक कागदपत्रांची तपासणी करण्यात आलेली आहे.
- तपासणी केल्यानुसार खालीलप्रमाणे याद्या प्रसिद्ध करण्यात येत आहे.

| अ क्र | यादी क्रमांक | तपशील | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|
| १. | एक (१) | परिपूर्ण अर्ज असलेल्या उमेदवारांची यादी | १०६४ |
| २. | दोन (२) | अर्ज व कागदपत्रांमध्ये त्रुटी असलेल्या उमेदवारांची यादी | २८७ |
| ३. | तीन (३) | अपात्र उमेदवारांची यादी | २५ |
| ४. | चार (४) | अर्ज व कागदपत्रांची हार्ड कॉपी महाज्योती कार्यालयास प्राप्त न झालेल्या उमेदवारांची यादी | ७० |
| ५. | पाच (५) | दोनवेळा अर्ज केलेल्या उमेदवारांची यादी | ७ |
| | | **एकूण** | **१४५३** |

- **यादी क्रमांक दोन (२) मधील उमेदवारांसाठी सूचना :** आपल्या नावासमोर दर्शविण्यात आलेली त्रुटी पूर्तता करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे (हार्ड कॉपी) स्वसाक्षांकित करून दिनांक २८.११.२०२३, दु.५.३० वाजेपर्यंत समक्ष किंवा स्पीडपोस्टाने महाज्योतीच्या खालील

पत्त्यावर जमा कराव्यात. त्यानंतर आलेल्या अर्जांचा/कागदपत्रांचा विचार करण्यात येणार नाही. जे उमेदवार विहित मुदतीत कागदपत्रांची पूर्तता करणार नाहीत अश्या उमेदवारांना अपात्र घोषित करण्यात येईल, मेलद्वारे सादर केलेली कोणतेही कागदपत्रे स्वीकारली जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

- **यादी क्रमांक चार (४) मधील उमेदवारांसाठी सूचना :** आपल्या ऑनलाईन अर्जाची प्रत व आवश्यक परिपूर्ण कागदपत्रे स्वसाक्षांकित करून ही दिनांक २८.११.२०२३, दु.५.३० वाजेपर्यंत समक्ष किंवा स्पीडपोस्टाने महाज्योतीच्या खालील पत्त्यावर जमा कराव्यात. त्यानंतर आलेल्या अर्जांचा विचार करण्यात येणार नाही. जे उमेदवार विहित मुदतीत ऑनलाईन अर्जाची प्रत व आवश्यक परिपूर्ण कागदपत्रे स्वसाक्षांकित करून जमा करणार नाहीत अश्या उमेदवारांना अपात्र घोषित करण्यात येईल, मेलद्वारे सादर केलेली कोणतेही कागदपत्रे स्वीकारली जाणार नाहीत,याची नोंद घ्यावी.
- **यादी क्रमांक तीन (३) मधील उमेदवार हे योजनेचा लाभ घेण्यास अपात्र असल्याचे घोषित करण्यात येत आहे.**
- **यादी क्रमांक पाच (५) मधील उमेदवारांचा एकच अर्ज ग्राह्य धरण्यात आलेला आहे.**
- महाज्योती संस्थेमार्फत महात्मा ज्योतिबा फुले संशोधन अधिछात्रवृत्ती (MJPRF) वर्ष २०२३ योजनेकरिता अर्ज केलेल्या कोणत्याही विद्यार्थ्याने चुकीची माहिती अथवा दिशाभूल करणारे कागदपत्रे सादर केल्याचे निदर्शनास आल्यास त्यांचा अर्ज कोणत्याही क्षणी रद्द करण्याचा अधिकार महाज्योतीने राखून ठेवलेला आहे.
- महाज्योती संस्थेमार्फत महात्मा ज्योतिबा फुले संशोधन अधिछात्रवृत्ती (MJPRF) वर्ष २०२३ योजनेकरिता २०० विद्यार्थ्यांची निवड करण्यासाठी परीक्षा घेण्यात येणार आहे, याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी. याबाबतच्या स्वतंत्र सूचना या महाज्योतीच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येतील.
- <u>कागदपत्रे पाठविण्यासाठी पत्ता :</u>

**Managing Director,**
**Mahatama Jyotiba Phule Research and Training Institute (MAHAJYOTI),**
**3rd Floor, A wing, Dr.Babasaheb Ambedkar Samajik Nyay Bhavan,**
**infront of Government ITI, Deekshabhumi Road,**
**Vasant Nagar, Shraddha Nand Peth, Nagpur – 440020.**
**Phone No. 0712- 2959381**

उमेदवारांना काही शंका असल्यास ०७१२-२८७०१२० किंवा ०७१२-२८७०१२१ (कार्यालयीन वेळेत) या क्रमांकावर संपर्क करावा.

स्वा/-
(राजेश खवले)
व्यवस्थापकीय संचालक,
महात्मा ज्योतिबा फुले संशोधन
व प्रशिक्षण संस्था, (महाज्योती), नागपूर.